मुख्य कार्यालय, विरार
विरार (पूर्व),
ता.वसई,जि.पालघर,पिन-४०१ ३०५.

दुरध्वनी : ०२५०-५१०१/०२/०३/०४/०५/०६
फॅक्स : ०२५०-२५२५१०७
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com
जा.क्र : वविशम/पर्या / 63 /२३-२४
दि. : 9/11/2023

# वसई विरार शहर महानगरपालिका

## "माझी वसुंधरा अभियान ४.०" अंतर्गत फटाक्यांबाबत जाहीर आवाहन

वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील सर्व नागरिकांना सूचित करण्यात येते की, भारत सरकार , अधिसूचना क्रमाक G.S.R. 682 (E) , DT 5/10/1999 अन्वये 125 db (AI) डेसिबल पेक्षा जास्त आवाज निर्माण करणाऱ्या फटाक्यांची निर्मिती , विक्री किंवा वापर करण्यास मनाई केली आहे. अशा फटाक्यांचे उत्पादन , विक्री किंवा वापर, साठवणूक बेकायदेशीर आहे.

तसेच आपण सर्वांना माहितीच आहे की, आपण वैश्विक वातावरणीय बदलास सामोरे जात आहोत. वातावरणीय बदलाच्या अनेक कारणांपैकी हवेचे प्रदूषण हे महत्वाचे कारण आहे. विविध सण / उत्सव प्रसंगी आपण वाजवत असलेल्या फटाक्यामध्ये कार्बन डायऑक्साइड व सल्फरचे प्रमाण अधिक असते. जे विषारी वायूचे उत्सर्जन करतात, या उत्सर्जनामुळे पृथ्वीवरील तापमानात वाढ होत असून या वायुमुळे, वनस्पती , पक्षी, प्राणी तसेच मानवी प्रजातीस हानी पोहोचवते, हवेचे प्रदूषण थांबवण्याची क्रिया आपण स्वत: पासून सुरु करु शकतो. महाराष्ट्र शासनाने "माझी वसुंधरा अभियान ४.०" अभियानातर्गत फटाकेमुक्त , कचरामुक्त , प्रदूषणमुक्त , व पर्यावरणपूरक ग्रीन फेस्टिवल , सण – उत्सव साजरे करण्याचा प्रयत्न करु सदर अभियानांतर्गत नागरिकांनी फटाक्यांचा वापर टाळावा, प्लॅस्टिक पिशवी वापर टाळून कापडी किंवा पुर्नवापर करण्यायोग्य वस्तुंचा वापर जास्तीत जास्त करावा व पर्यावरणपूरक , प्रदूषणमुक्त दिवाळी साजरी करावी

सही/-
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका